# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक २१/२०१९** **दिनांक १२/०३/२०१९** **कालावधी ५ दिवस**


| डॉ. सुभाष चव्हाण, | डॉ. विजय मोरे, | डॉ. शितल यादव, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०६/०३/२०१९ ते १२/०३/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १३/०३/२०१९ सकाळी ८:३० पासून १७/०३/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६/०३ | ०७/०३ | ०८/०३ | ०९/०३ | १०/०३ | ११/०३ | १२/०३ | | १३/०३ | १४/०३ | १५/०३ | १६/०३ | १७/०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| २९.० | २९.० | ३०.० | ३२.० | ३२.० | ३२.० | - | कमाल तापमान (अं.से) | ३१ | २९ | ३० | ३३ | ३२ |
| १६.५ | १८.४ | १८.२ | १८.६ | १८. ० | १८.६ | - | किमान तापमान (अं.से) | २० | २० | २१ | २१ | २२ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | ० | ० | ० | ० |
| ९२ | ९१ | ७७ | ७५ | ७० | ८१ | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ५९ | ५५ | ३५ | ३२ | ४१ |
| ५७ | ५३ | ३७ | ४२ | ४२ | ४५ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३२ | ३० | २५ | १९ | २३ |
| ३.२ | ३.० | ३.६ | ४.० | ४.० | ३.२ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | ७ | १० | ५ | ४ |
| शांत | शांत | शांत | द. | शांत | नै.द. | - | वाऱ्याची दिशा | ई.ऊ. | ई. | ई. | ई. | ई.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | २३५९.६ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १३ ते १७ मार्च, २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. दिनांक १३ ते १६ मार्च, २०१९ पर्यंत वाऱ्याचा वेगात ९ ते २२ कि.मी. पर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| उन्हाळी भात | फुटवे अवस्था | • भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें. मी. ठेवावी. |
| भुईमुग | आऱ्या अवस्था | • भुईमुग पिकावर पाने पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास, किडीच्या नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि. ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| आंबा | फलधारणा अवस्था | • तापमानातील होणाऱ्या बदलामुळे आंब्याची फळगळ होण्याची शक्यता आहे. फळगळ कमी करण्यासाठी फळधारणा झाल्यावर पाण्याच्या उपलब्धतेनुसार आंब्याच्या झाडास १५० ते २०० लिटर पाण्याच्या ३ ते ४ पाळ्या १५ दिवसांच्या अंतराने दयाव्यात आणि झाडाच्या बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा.<br>• फळ वाटणा आकारचे असताना फळाचा आकार, फळाचे वजन फळामधील साका आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० आकाराची पेपर पिशवी लावावी.<br>• पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार दयावा. नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. उन्हाळ्यात पहिल्या वर्षी आठवडयातून दोन वेळा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून दोन वेळा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून दोन वेळा प्रत्येक कलमांना ६० लिटर पाणी दयावे. |
| नारळ | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार दयावा तसेच कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून पहिली दोन वर्षे रोपांना वरून सावली करावी.<br>• नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी नारळ बागेमध्ये शेणखताच्या खड्यात अळ्यांना मारण्यासाठी दर दोन महिन्यांनी क्लोरोपायरीफॉस २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| चिकू | फुलोरा व फलधारणा | • तापमानात वाढ संभवत असल्याने, चिकू बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आच्छादनाचा वापर करावा.<br>• चिकू पिकामध्ये फुलकळी पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एस. जी. ४.५ ग्रॅम किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १० मि. ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही १० मि. ली. किंवा प्रोफेनोफोस ४० टक्के प्रवाही १० मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात या पैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी ५० टक्के फुले आल्यावर एकुण तीन फवारण्या एक महिन्याच्या अंतराने मार्च, एप्रिल व मे मध्ये कराव्यात. तसेच किडीच्या सर्वेक्षणासाठी निळ्या रंगाच्या प्रकाशसापळा बागेत बसवावा. |
| केळी | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने, केळी बागेत आठवडयातून दोन वेळा पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आच्छादनाचा वापर करावा. पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या केळी बागेत काठीचा आधार दयावा. |
| फुलपिके | काढणी अवस्था | • मोगरा पिकामध्ये काढणी योग्य असलेल्या फुलांची काढणी सकाळी करावी. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | फलधारणा | • उन्हाळी भेंडी पिकास गरजेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• वांगी पिकाची काढणी फळे चमकदार व कोवळी असताना करावी. मिरची पिकामध्ये तयार हिरव्या मिरचीची काढणी करावी.<br>• फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• दिवसाच्या कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने कोंबड्यांचे व जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**